Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi / Hindi Part - I

# AJANTA

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with OKEN Scanner

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | मराठी साहित्य आणि संगीत संबंध<br>**प्रा. वंदना मधुकरराव देशमुख** | ६१-७१ |
| १६ | जी. ए. कुलकर्णी यांच्या 'वस्त्र' कथेतील आदिबंध<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | ७२-७४ |
| १७ | संत तुकारामांच्या मनविषयक विचारांचा शोध<br>**प्रा. डॉ. हनुमंत मारोती भोपाळे** | ७५-७८ |
| १८ | लोकसाहित्य आणि महत्त्व<br>**सहायक प्रा. अडसरे व्ही. बी.** | ७९-८२ |
| १९ | ग्रामीण, दलित व उपेक्षीत समाजाती मुलांवर केंद्रिय लघुपट<br>**प्रा. अर्चना सं. देशपांडे** | ८३-८७ |
| २० | 'थँक यू मिस्टर ग्लाड' या नाटकातील मि. ग्लाडचे व्यक्तिचित्र<br>**प्रा. डॉ. अविनाश श. धोबे** | ८८-९० |
| २१ | लळिताचे स्वरुप आणि समाजाभिमुखता<br>**प्रा. सुनिता गोरख रोकडे** | ९१-९६ |
| २२ | मराठी दलित कवितेतून व्यक्त झालेला मानवी हक्काचा विचार<br>**प्रा. दिपक संतोष पवार** | ९७-१०० |
| २३ | ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप<br>**प्रा. डॉ. राजकुमार रघुनाथ मुसणे** | १०१-१०५ |
| २४ | जागतिकीकरण आणि मराठी भाषा<br>**प्रा. डॉ. टापरे अंजली** | १०६-१०७ |
| २५ | वऱ्हाड प्रांतातील सुफी संतांचे साहित्य योगदान<br>**किशोर मारोतीराव वानखडे** | १०८-१११ |



Scanned with OKEN Scanner

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १८. लोकसाहित्य आणि महत्त्व

**सहायक प्रा. अडसरे व्ही. बी.**
अण्णासाहेब आवटे कॉलेज मंचर, पुणे.

प्रस्तावना

लोकसाहित्याचे संकलन हे महाराष्ट्रात तसेच त्यासंबधी लेखन 1858 पासून सुरू झाले. निरनिराळ्या लोकसाहित्य प्रकारांना पारिभाषिक संज्ञा या 1915 पासून वापरण्यात येऊ लागल्या. 1916 पासून लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्टेला प्रारंभ होतो. कै. वि. का. राजवाडे यांनी लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्टेचे कार्य केले. लोकसाहित्याच्या रूपा, आधार आणि महत्त्व लोकांच्या मनावार बिंबवण्याचे कामही राजवाडयांनी केले. 1920 साली कै. राजवाडे यांनी 'लोकगीत' हा पारिभाषिक शब्द वापरला आणि 'सज्जनगडावरचे एक लोकगीत' या लेखात लोकगीताची लक्षणे सांगितली 'लोककथा' हा पारिभाषिक शब्द राजवाडे यांनी प्रथम वापरला. ना.गो.चाफेकर हे 'महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे' संपादक होते. यामध्ये लोकगीत व लोककथा प्रसिद्ध केले आणि हे शब्द रुढ करण्याचे श्रेय मिळविले. 1930 साली य. गो. दाते यांचे 'लोककथा' हे पुस्तक प्रसिदध झाले. या पुस्तकातील प्रस्तावनेत म.म.दत्तो वामन पोतदार यानी इंग्रजीतील Folklore चे भाषांतर म्हणुन 'लोकविदया' हा शब्द वापरला. नंतरच्या काळात Folklore साठी 'लोकवाङ्मय' आणि 'लोकसाहित्य' हे दोन्ही शब्द वापरण्यात येऊ लागले. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथात Folklore साठी 'लोकसाहित्य' हा पारिभाषिक शब्द सुचविला. प्रा. द. वा पोतदारांनी 'लोकविदया' हा शब्द सुचविला परंतु तो रूढ झाला नाही. 'साहित्यामध्ये' वाङ्मय, ज्ञान व विधी यांची विविध अंगे प्रतित होतात व 'विदया' या शब्दापेक्षा 'साहित्य' या शब्दाची व्याप्ती जास्त असल्यामुळे हा शब्द रुढ झाला.

**महाराष्ट्र शब्दकोशात 'लोक' या शब्दाचे अर्थ**

१. जन, मनुष्य, मानवजात, समाज.
२. वर्ग, विशिष्ट समाज, संघ, जात.
३. राष्ट्र, प्रांत.
४. जगाचे, विश्वाचे भाग, असे विविध अर्थ आहेत.

लोकसाहित्य या शब्दात विशिष्ट समाज या अर्थाने 'लोक' या शब्दाची योजना केली आहे. ज्या Folk या शब्दासाठी हे पद वापरले जाते तो जर्मन भाषेच्या volk या शब्दासाठी तयार झाला आहे volk या शब्दाचा अर्थ People किंवा लोक जगातील अनेक भाषेमध्ये किंचित उच्चारभेदासह Folklore हा शब्द रूढ झाला. फ्रेंच भाषेत यासाठी Le Folklore', इटालियन भाषेत 'il Folklore' आणि स्पॅनिश भाषेत 'El Folklore' असे शब्द रूढ झाले. म्हणुनच मराठीत लोकसाहित्य हा शब्द Folklore या इंग्रजी शब्दासाठी वापरला जातो.

'लोक' या शब्दाची भारतीय परंपरा

1 Folk या पदासाठी मराठीत 'लोक' हे पद वापरण्यात येते. लोक हा शब्द सिद्धांत कौमुदीत संस्कृतीतील लोकृदशने धातुपासुन निष्पन्न झाला आहे. या धातुचा अर्थ पाहणे असा होतो. यावरून लोक या शब्दाचा अर्थ पाहण्याचे कार्य करणारा जनसमुदाय असा होतो.

2 लोक हा शब्द भारतात प्राचीन काळापासून वापरण्यात येतो. जनसामान्य या अर्थाने ऋग्वेदात अनेक ठिकाणी आला आहे. ऋग्वेदात लोक या शब्दासाठी 'जन' या शब्दाचा वापर करतात. ऋग्वेदातील प्रसिद्ध पुरूषसुक्तात 'लोक' हा शब्द जन आणि स्थान या दोन्ही अर्थाने वापरतात. प्रसिद्ध वैयाकरण पाणिनीने अष्टाध्यायी मध्ये लोक आणि सर्व लोक या पदाचा उल्लेख केला आहे. या पदांना प्रत्यय लावून लौकिक आणि सार्वलौकिक हे शब्द सिद्ध केले आहे. पाणिनी अनेक शब्द कसे निष्पन्न होतात हे दाखवितात एखादया शब्दाचे रूप हे भिन्न समजले पाहिजे. वररूचींनी आपल्या वार्तिकातही लोक हा शब्द वापरला जातो. तसेच एखादा शब्द लोकांमध्ये विशिष्ट रूपात वापरला जातो.

3 भरताच्या नाटयशास्त्रातील चौदाव्या अध्यायात नाटयधर्मी आणि लोकधर्मी प्रवृत्तीची चर्चा केली आहे व्यासांनी महाभारतात सात संहिताचे महत्त्व सांगताना महाभारत हा ग्रंथ व्यथित असलेल्या अज्ञजनांना म्हणजेच हा ग्रंथ लोकांना ज्ञान देणारा असून त्याच्या डोळयात ज्ञानरूपी अंजनाची शलाखा त्याचे डोळे उघडतो. महाभारतात विविध विषयाची चर्चा करताना त्यांनी लोकयात्रेचा उल्लेख केला आहे भगवदगीतेतील लोक व लोकसंग्रह या शब्दाचा वापर केला आहे. श्रीकृष्णाने लोकसंग्रहावर बराच भर दिला आहे. लोकसंग्रह हा शब्द सामान्यजनांचे आचरण, व्यवहार आणि आदर्श या अर्थाने वापरला आहे

4 भारतीय पंरपरेत 'लोक' हा शब्द वेदेत्तर संस्कृती अशा संकुचित अर्थाने वापरला आहे. पंरतु त्याचा वापर आता व्यापक अर्थाने होत आहे.

5 अशोकाच्या शिलालेखात 'लोक' हा शब्द व्यापक अर्थाने वापरला आहे. लोक हा शब्द समस्त प्रजा, लोकसत्ता, लोकशाही अशा शब्दांमध्ये हे पद समस्त प्रजा किंवा सर्व जनता या अर्थाने वापरले आहे लोकसाहित्य या सामासिक शब्दांमध्ये व्यापक अर्थाने हे पद वापरले जात नाही.

लोकसाहित्य म्हणजे काय ?

1. जौनास बॅलिस

लोकसाहित्य हे आदिमानवनिर्मित असून परंपरा प्राप्त असते. त्याचप्रमाणे ते सुसंस्कृत मानवाने निर्मिलेले असते ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याद्वारे पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककलाप्रकार, त्याचप्रमाणे नृत्य, नाटय इत्यादींचा अंतर्भाव त्यात होतो. लोकसाहित्य हे समूहाच्या आविष्काराचे शास्त्र नाही. तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्काराचे शास्त्र आहे.

2. डॉ. ना. गो. नांदापूरकर

लोकसाहित्य म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक पंरपरेने आलेले वाङ्मय होय याचा कर्ता लोकच अर्थात अज्ञात अशी लोकमानसातील व्यक्ती होय तसेच लोकानी केलेले, लोकभाषेत केलेले आणि लोकाच्या पंरपरेने चालत आलेले जे वाड्.मय तेच लोकवाड्.मय होय. वाड्.मयाच्या या प्रकारात लोककथा, उखाणे, आहाणे, उखाणे आणि लोकगीते येतात.

3. लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे कोणत्याही देशास, समाजास, साहित्यास फायदा हा होतो. कारण देशाच्या प्राचीन संस्कृतीचे आचारविचारांचे, रीतीरिवाजांचे ज्ञान मिळते.

4. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व विशद करतांना श्री. रामनरेश त्रिपाठी म्हणतात, "देश व भाषा इतिहास और उसका नैतिक और सामाजिक आदर्श इन लोकसाहित्यों से ऐसा सुरक्षित है कि इनका नाश होने से दुर्भाग्य की बात होगी" म्हणजेच लोकसाहित्यातून आपल्याला केवळ सामाजिक, धार्मिक आणि पारंपारिक गोष्टी इतिहास कळतो तसेच त्यांच्या विकासाचेही ज्ञान आपणास होते.

5. लोकसाहित्यामध्ये गतकालीन लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकजीवनातील आचार विचार पध्दती, सण उत्सव यांचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. लोकसाहित्यामधील नवीन बदलांची जाणीव ठेवूनच एका पिढीकडून दुस–या पिढीकडे लोकसाहित्याची देवाणघेवाण होत असतांना नवीन बदलांना सामोरे जावे लागते. यादृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

6. लोकसाहित्यामध्ये व्यक्त होणारे समाजजीवन, लोकजीवनातील चालीरीती, समाजाची व्यवस्थापना, ग्राम आणि कौटुंबिक जीवन या घटना समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. समाजशास्त्रातील लोकजीवनाचे रहस्ये उलगडण्याचा प्रयत्न लोकसाहित्यामध्ये केला जातो.

7. लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे इतिहासाची ओळख होते. इतिहास हा लोकजीवनामध्ये महत्वाचा घटक मानला जातो. लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा आविष्कार त्याचा लोकजीवनावर गतकालीन घटनाचा कोणत्या अवस्थेपर्यंत व कितपत परिणाम होतो हे लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे कळू शकते.

8. लोकसाहित्यामध्ये भाषाशास्त्राचे महत्त्व लक्षात घेण्यासारखे आहे. भाषा ही नेहमी बदलत असते म्हणून समाजजीवनाचा परिणाम होतो. तसेच सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम व्यक्तीच्या विविध अवस्थांमध्ये होत असतो तसेच शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक इ. प्रभावही भाषेवर पडतो. म्हणजेच लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे पूर्वापार चालत आलेले शब्द आजही तग धरून आहे म्हणूनच लोकसाहित्याच्या अभ्यासामध्ये भाषाशास्त्रास महत्त्वाचे स्थान आहे.

9. लोकसाहित्याच्या अभ्यासामध्ये वाड्.मयीनदृष्टया खूप महत्त्व आहे. त्यामध्ये लालित्य, कल्पनाविलास प्रतिमासृष्टी, त्यातून प्रकटलेला रसाविष्कार आणि भावनाविष्कार यांना अत्यंत मोलाचे स्थान आहे. तसेच लोकसाहित्यामधील लोकगीते व कथा यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास वाड्.मयीन ज्ञानात भर पडते.

10. लोकसाहित्याचा संग्रह केल्यामुळे त्याच्या अभ्यासास विशेष महत्त्व प्राप्त झाले. मौखिक साहित्य परंपरेने एका पिढीपासून दुस–या पिढीपर्यंत पोहचवितांना ते लिपीबध्द केले जाते. त्यामुळे व्यक्तीच्या मृत्यूनंतर पुढील पिढीत त्याचा संग्रह हा नवीन पिढीसाठी महत्वपुर्ण ठरतो.

लोकसाहित्याचे अध्ययन हे विविध ज्ञानशाखांच्या अध्ययन संशोधनास अत्यंत उपयुक्त ठरते. म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**संदर्भ**

1. भवाळकर ता., (2009), लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा, पुणे: स्नेहवर्धन प्रकाशन.
2. यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, (2002), लोकवाड्.मय, नाशिक.
3. भागवत दु. (1977), लोकसाहित्याची रूपरेखा, पुणे: वरदा बुक्स.
4. मांडे प्र., (1975), लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, पुणे: कॉन्टिनेण्टल प्रकाशन.



Scanned with OKEN Scanner